**पोलीस अधीक्षक कार्यालय,परभणी.**

दुरध्वनी क्र.- ०२४५२ - २२६२४४

ई मेल - sp.parbhani@mahapolice.gov.in आस्थापना शाखा


जा.क्र.आस्था-१/पोशि.भरती-२०२४-२५/पोशि-ता.नि.कागदपत्र तपासणी/२०२६ परभणी दि. १० /०४/२०२६

## -:: प्रसिध्दीपत्रक ::-

## परभणी जिल्हा पोलीस भरती 2024-25

## पोलीस शिपाई - तात्पुरती निवड यादीतील उमेदवारांसाठी कागदपत्र पडताळणीबाबत सुचना

परभणी जिल्हा पोलीस भरती 2024-25 च्या जाहिरातीत दर्शविल्याप्रमाणे पोलीस शिपाई संवर्गातील (86) रिक्त पदांसाठी शरीरिक चाचणी/लेखी परीक्षा/एनसीसी सी प्रमाणपत्राच्या एकत्रित गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून सामाजिक/समांतर आरक्षण प्रवर्गनिहाय तात्पुरती निवड यादी व तात्पुरती प्रतिक्षा यादी परभणी जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत संकेतस्थळावर दिनांक 09/04/2026 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

परभणी जिल्हा पोलीस भरती 2024-25 च्या अनुषंगाने कागदपत्र पडताळणीच्या अधिन राहून प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड उमेदवारांनी दिनांक 13/04/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता सहयाद्री हॉल, पोलीस मुख्यालय, परभणी येथे खालील प्रमाणे नमूद मुळ शैक्षणीक व इतर आवश्यक मुळ कागदपत्र व त्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीचे 2 संच (self-attested) व 4 पासपोर्ट साईज फोटोसह हजर रहावे.

| अ.क्र. | आवश्यक कागदपत्र | अ.क्र. | आवश्यक कागदपत्र |
|---|---|---|---|
| 01. | एसएससी (10) चे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र | 02. | एससीसी (10) उत्तीर्ण गुणपत्रक व सनद |
| 03. | एचएससी (12) वी उत्तीर्ण गुणपत्रक/सनद | 04. | जातीचे प्रमाणपत्र |
| 05. | जात वैधता प्रमाणपत्र (असल्यास) | 06. | अधिवास प्रमाणपत्र |
| 07. | नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र | 08. | संगणक अर्हता |
| 09. | माजी सैनिक डिस्चार्ज कार्ड | 10. | गृहरक्षक दलाकरीता आवश्यक असलेले प्रमाणपत्र |
| 11. | प्रकल्पग्रस्तांसाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र | 12. | खेळाडूसाठी आवश्यक असलेले प्रमाणपत्र |
| 13. | खेळाडू प्रमाणपत्र उपसंचालक, क्रीडा विभाग यांचा पडताळणी अहवाल/पोच पावती | 14. | ईडब्ल्युएस प्रमाणपत्र |
| 15. | एनसीसी सी प्रमाणपत्र | 16. | शरीरिक चाचणी व लेखी चाचणीचे प्रवेशपत्र |
| 17. | ऑनलाईन आवेदन अर्जाची प्रत | 18. | हलके वाहन चालविण्याचा परवाना (LMV) |
| 19. | आवेदन अर्जात नमुद केलेले उच्च शैक्षणिक अर्हता इत्यादी प्रमाणपत्र | 20. | जाहिरातीत नमुद केलेली इतर सर्व आवश्यक कागदपत्र |

तात्पुरत्या निवड यादीतील उमेदवारांना दिनांक 13/04/2026 रोजी सकाळी 09.30 वाजता कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आलेले आहे. कागदपत्र पडताळणीसाठी बोलाविण्यात आले म्हणुन उमेदवारांना नियुक्तीसाठी दावा करता येणार नाही. याबाबत सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

कागदपत्र पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांची सामाजिक/समांतर आरक्षण प्रवर्ग निहाय गुणवत्तेनुसार अंतिम निवड करण्यात येईल. याबाबत सर्व उमेदवारांनी व्यक्तीश: नोंद घ्यावी.

Superintendent of Police पोलीस अधिक्षक कार्यालय परभणी Parbhani

( **रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी** ) IPS
पोलीस अधीक्षक, परभणी